# येशूने देवाच्या वचनाचा अर्थ सांगून लोकांची अंत:करणे चेतविली

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, मुले प्राचीन संदेष्ट्यांनी येशूविषयी सांगितलेली भाकिते शिकतील तेव्हा अम्माऊसच्या वाटेवर शिष्यांच्या अंत:करणांना उकळी फुटली होती तशी मुलांची अंत:करणेही चेतविली जावीत यासाठी तू त्यांना कृपा करून साहाय्य कर.''

मुलांचे वय आणि गरजांना अनुरूप असे कार्यक्रम शिकविण्यासाठी निवडा.

मोठ्या मुलाने वा शिक्षकाने लूक 24:13-35 मधून चेतविलेल्या अंत:करणांचा वृत्तांत वाचून दाखववावा किंवा सांगावा.

**स्पष्ट करा.** येशूने दोन माणसांना पवित्र शास्त्रातील त्याच्याविषयीची भविष्ये सांगितली: त्यांना इतका आनंद झाला की त्यांच्या अंत:करणाला उकळी फुटली. पुढे काय होणार आहे हे देवाने आपल्या प्राचीन संदेष्ट्यांना अगोदर कळविले होते.



पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे आहेत)

- दोन माणसांनी येशूला पहिल्यांदा पाहिल्यावर ओळखले का? (पाहा वचन 16)
- दोन माणसे इतकी उदास का दिसत होती? (वचन 20 येशू मरण पावला होता)
- दोन माणसे येशूबद्दल काय म्हणत होती? (वचन 19-23)
- येशूने त्यांच्या दु:खाविषयी काय म्हटले? (वचन 26)
- येशूने दोन माणसांना कशाचा अर्थ स्पष्ट करून सांगितला? (वचन 27)
- शेवटी त्यांनी येशूला कधी ओळखले? (वचने 30-31)

नाट्यीकरण करा. अम्माऊसच्या वाटेने जाणारे दोन शिष्य, लूक 24:13-35.

- मुलांनी तयारी केलेली छोटी नाटिका सादर करण्यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून व्यवस्था करा.

- शिकविण्याच्या वेळेचा उपयोग मुलांकडून नाटिकेची तयारी करून घेण्यासाठी करा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांकडून तयारी करून घ्यावी.
- मोठी मुले किंवा प्रौढांनी येशू स्तोत्रकर्ता (सहाजण) आणि निवेदक ह्या भूमिका साकाराव्यात निवेदक वृत्तांताचा सारांश तयार करून मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करा. नाटिकेमध्ये उल्लेख केलेली स्तोत्र 22 मधील वचने स्तोत्रकर्त्यांच्या भूमिका करणाऱ्यांनी वाचावी किंवा पाठ म्हणावी.
- लहान मुलांना क्लयपा, सोबती व शिष्य ह्या भूमिका द्या.

**निवेदकः** लूक 24:13-27 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''क्लयपा काय म्हणतो ते ऐका''

**क्लयपाः** (चालता चालता सोबत्याशी बोला) ''येशू मरण पावला म्हणून मला खूप वाईट वाटते! देवाने त्याला का मरू दिले?''

**येशूः** ''मित्रांनो तुम्ही कोणाबद्दल बोलत आहात?''

**सोबतीः** येशू मेला तो पराक्रमी संदेष्टा होता, तो इस्राएलाचा राजा होईल असे आम्हाला वाटले; पण, आमच्या अधिकाऱ्यांनी त्याला मारले. आज काही स्त्रियांनी सांगितले की तो पुन्हा जिवंत झाला आहे!''

**येशूः** ''तुम्हाला समजत नाही का? त्याने दुःख सहन करून मरणे अगत्याचे होते. शास्त्रलेखात त्याच्याविषयी काय म्हटले आहे ते आता ऐका.''

**निवेदकः** ''येशूने त्याच्या कार्याविषयीचे भाकीत सांगणारा शास्त्रलेख उद्धत केला, तेव्हा त्यांच्या अंत:करणाला आतल्या आत उकळी आली. येशूच्या वधस्तंभावरील मरणाविषयी दावीदाने स्तोत्र 22 मध्ये काय भाकित केले ते ऐका.''

**स्तोत्रः**

''माझ्या देवा माझ्या देवा, तू माझा त्याग का केला?''
''मला पाहणारे सर्व माझा उपहास करितात वांकुल्या
दाखवितात. थट्टेने डोके डोलवितात.''
''ते म्हणतात त्याने परमेश्वरावर आपला हवाला
टाकिला आहे, तो त्याला मुक्त करो; तो त्याला सोडवो,
कारण तो त्याचा आवडता आहे''
''दुर्जनांच्या टोळीने मला घेरिले आहे,
त्यांनी माझे हातापाय विंधिले आहेत.''
''मला आपली सर्व हाडे मोजिता येतात,
ते माझ्याकडे टक लावून पाहतात.''
''ते माझी वस्त्रे आपसांत वाटून घेतात
आणि माझ्या झग्यावर चिठ्ठ्या टाकितात.''

**निवेदकः** लूक 24:28-35 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''क्लयपा काय म्हणतो ते ऐका.''

**क्लयपाः** (येशूशी बोला) ''मित्रा बरीच रात्र झाली. पुढे न जाता, आज येथेच आमच्याबरोबर राहा.''

**येशूः** ''मी भाकरीवर आशीर्वाद मागतो. देवा ह्या अन्नाबद्दल धन्यवाद.'' (भाकरी मोडल्याचा अभिनय करून तुकडे क्लयपा व सोबत्याला द्या.)

**क्लयपा व सोबतीः** शिष्यांकडे धावत जा मोठ्याने म्हणा, ''हा येशू आहे! होय तो तोच आहे!'' ''त्याच्या शिष्यांना सांगा!''

**शिष्य:** ''होय हे खरे आहे! ''आम्हीही त्याला पाहिले आहे!'' ''तो खरोखर उठला आहे!''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न:** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांना मोठ्या माणसांना विचारायला सांगा.

**विचारा:** येशू त्यांना आणि त्याचे पुनरूत्थान याविषयी ऐकून आमची अंत:करणे देव आनंदाने भरून टाकतो, अशा प्रसंगांची इतर उदाहरणे द्या. (मुलांना उदाहरणे देऊ द्या.)

अंत:करणात पेटलेल्या अग्नीचे चित्र काढा मुलांनी काढलेली चित्रे उपासनेच्या वेळी मोठ्यांना दाखवून सांगावे की येशू आमची अंत:करणे आनंदाने भरतो. कारण तो मेलेला नाही; तो जिवंत आहे आणि त्याचा आत्मा आमच्या ठायी सदासर्वकाळ राहतो.



**पाठ करा** यहेज्केल 36:25-26 (लहान मुलांना फक्त वचन 26 पाठ करायला सांगा).

25 ''मी तुम्हावर शुद्ध पाणी शिंपडीन म्हणजे तुम्ही शुद्ध व्हाल, तुमची सर्व मलिनता व तुमच्या सर्व मूर्ती यापासून मी तुमची शुद्धी करीन''

26 ''मी तुम्हास नवे हृदय देईन, तुमच्या ठायी नवा आत्मा घालीन, तुमच्या देहातून पाषाणमय हृदय काढून टाकीन तुम्हास मांसमय हृदय देईन.''

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु, तुझ्या पुनरूत्थानाच्या आठवणीने आमची अंत:करणे आनंदाने भरून येतात. तू तसाच मेलेला राहिला नाहीस तर तू जिवंत आहेस! तू आमच्या ठायी राहून आम्हाला जीवन देतोस. तुला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याची आणि तुझ्याबरोबर चिरकाल राहण्याची आम्हाला उत्कंठा लागलेली आहे. प्रभू येशू लवकर ये.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied.
Download from www.Paul-Timothy.net